# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३९–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. भिमराव दत्तू हजारे,<br>मु. पो. बोरगांव, ता. तासगांव, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभागीय कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, तासगांव १, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u>** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. भिमराव दत्तू हजारे, मु. पो. बोरगांव, ता. तासगांव, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी दि. ४.११.२०१० रोजी अर्ज दिला व प्रोसेसिंग फी रु.५०/– दि. ४.१.२०१० रोजी पावती क्रमांक ४३४६९८९ ने भरली. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार १ महिन्याचे मुदतीत म्हणजे दि. ३.२.२०१० पर्यंत त्यांना चलन मिळणे आवश्यक होते, ते दि. २२.४.२०१० रोजी देण्यात आले आहे. यामुळे वितरण कंपनीस कृती मानके विनियमातील तरतुदींचे पालन करण्यात अपयश आल्याने तक्रारदार भरपाईची मागणी करु शकतो. त्यानुसार तक्रारदाराने मंचाकडे विलंबापोटी भरपाईची मागणी केली आहे.

यापूर्वी तक्रारदार यांनी तक्रार क्र. १५७ दि. १४.६.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली येथे रितसर तक्रार केली आहे. अंतर्गत कक्षाने दि. २१.६.२०१० च्या आदेशानुसार ग्राहकास भरपाई द्यावी असे आदेश दिले आहे. मंचासमोर तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे मार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या २७.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांना दि. २२.४.२०१० रोजी चलन देण्यात आले असल्याचे मान्य केले.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २८.७.२०१० रोजी घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. व्हनमाने, सहाय्यक अभियंता, श्री. जाधव, कनिष्ठ अभियंता, बोरगांव हजर. श्री. खापरे यांनी चलन देण्यास ११ आठवड्यांचा विलंब झाला असल्याने प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु.११००/–तक्रारदारास भरपाई मिळावी अशी मागणी केली. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी तक्रारदार यांना कनेक्शन देत आहोत, मटेरियल जागेवर पाठविण्यात आले आहे. तक्रारदार प्रतिनिधी यांनी १५ दिवसांत कनेक्शन दिल्यास तक्रार मागे घेत आहे असे सांगितले.

वि.प.च्या अधिकाऱ्यांचे म्हणण्यानुसार त्यांना दि. ६.८.२०१० पर्यंत मुदत देण्यात आली. परंतु वि.प.ने मंचासमोर अशी कुठलीही माहिती दिली नाही. दि. ६.८.२०१० रोजी दुपारी २.३० वाजता प्रतिनिधी श्री. खापरे यांचेकडून माहिती घेतली असतां, दि. ५.८.२०१० ला कनेक्शन दिले आहे, तसेच तक्रारदार भरपाई नको असे लिहून देणार आहे, त्यामुळे तक्रारदाराच्या लेखी अर्जानुसार तक्रार निकाली काढणेत यावी. तक्रारदार प्रतिनिधींनी तक्रारदाराच्या अर्जावर प्रतिनिधींनी सहाय्यक अभियंता तासगांव यांनी मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे मुदतीत वीज जोडणी दिली असल्याने तक्रार मागे घेत असल्याचे लेखी लिहून दिल्याने तक्रार निकाली काढणेत येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदार प्रतिनिधींनी लेखी निवेदनानुसार तक्रार निकाली काढण्यात येत आहे. तक्रारदार यांना वितरण कंपनीने दि. ५.८.२०१० रोजी वीज जोडणी दिली आहे असे मंचासमोर सांगण्यात आले आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष